पुढारी

# विद्या प्रतिष्ठानमध्ये सायबर सुरक्षा प्रशिक्षण



**सायबर सुरक्षा कार्यशाळेत सहभागी विद्यार्थ्यांसह प्राध्यापक.**

**बारामती : पुढारी वृत्तसेवा**

बारामती येथील विद्या प्रतिष्ठान कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय व क्विकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बीबीए (सीए), बीसीए (सायन्स) व बी. एसस्सी. (संगणक शास्त्र) या विभागामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'कमवा आणि शिका' या योजनेचा प्रारंभ करण्यात आला. या योजनेंतर्गत सायबर सुरक्षेवर प्रशिक्षण देण्यात आले.

'कमवा आणि शिका' या योजनेमध्ये विद्यार्थी प्रथम क्विकहिल फाउंडेशनकडून 'सायबर सुरक्षा'विषयी प्रशिक्षण घेऊन, इतर शाळा व महाविद्यालयांमध्ये जाऊन सायबर जागृती मोहीम राबवणार आहेत. महाविद्यालयामध्ये इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना एक दिवसीय कार्यशाळेद्वारे 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' अंतर्गत प्रशिक्षण दिले गेले. प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांनी विद्यार्थ्यांना या योजनेमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित केले. क्विकहिल फाउंडेशनच्या सीएसआर वरिष्ठ अधिकारी सुगंधा दानी यांनी सायबर सुरक्षेचे महत्त्व, सायबर गुन्ह्यांचे प्रकार त्यावरील उपाययोजना तसेच सुरक्षा जागरूकता मोहीम शाळा आदी विविध गोष्टींबाबत मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी झोनल समन्वयक धनंजय जाचक हेही उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये ४६ स्वयंसेवकांनी भाग घेतला. प्रास्ताविक विभागप्रमुख प्रा. महेश पवार यांनी केले. प्रा. सलमा शेख यांनी सूत्रसंचालन केले.

My Gramin Edition
Sep 16, 2023 Page No. 5
newspaper.pudhari.co.in